दिनांक : ११.०४.२०२५

# फिनिक्स स्कूल
# वार्षिक अहवाल २०२४ - २०२५

मुख्याध्यापिका व ६ शिक्षक पूर्ण वेळ, ३ शिक्षक अर्धवेळ, व ४ मावश्या कार्यरत आहेत.
शाळेत एकूण ५० विद्यार्थी आहेत.

दि.१०.०६.२०२४ रोजी पासून विद्यार्थी शाळेत येऊ लागले.

नविन प्रवेश

- यावर्षी १० नविन ॲडमिशन झाल्या.

अभ्यासक्रम

- यावर्षी पासून महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तकांतील अभ्यासक्रम सर्व वर्गांना दिला आहे.

सातत्याने चालणारे उपक्रम

- दि. २४.०७.२०२४ रोजी शाळेत मतदान झाले. त्यानुसार विद्यार्थी प्रतिनिधी निवडले गेले.
- दि. ०१.०८.२०२४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती सांगण्यात आली. तसेच अचानक विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा घेण्यात आली होती. त्याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद छान होता.
- दि. १५.०८.२०२४ रोजी श्री. प्रकाश डिंगणकर यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. सर्व स्टाफ उपस्थित होता.
- दि. ०५.०९.२०२३ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. L I & LII E + M मधील सर्व विद्यार्थ्यांनी शाळेचे कामकाज पाहिले. शिक्षक दिना निमित्त प्रिझम फौंडेशन कडून सर्व शिक्षकांना भेटवस्तू देण्यात आली.
- दि. ०९.०९.२०२४ रोजी प्रिझम फौंडेशन मध्ये गणपती स्थापना करण्यात आली. यावर्षी ‘खेळ’ या विषयावर गणपती सभोवताली व हॉल सजावट करण्यात आली होती. सजावटीसाठी लागणारे चार्ट, मॉडेल चित्रे विद्यार्थ्यांनी तयार केली होती. याव्दारे विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून विविध खेळांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी वाजत गाजत गणपतीची स्थापना केली.
- गांधी जयंती निमित्त दि. ०३.१०.२०२४ रोजी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वर्गाची व परिसर स्वच्छता करून घेतली.
- दि. ११.१०.२०२४ रोजी शारदोत्सवा निमित्त भोंडला साजरा करून विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली.
- दि. २५.१०.२०२४ रोजी दिवाळी पार्टी साजरी करण्यात आली. प्रिझम तर्फे सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना पुरी भाजी व शिरा देण्यात आला.

- दि. १४.११.२०२४ रोजी बालदिनानिमित्त विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आली.
- दि. १४.१२.२०२४ रोजी छोटया विद्यार्थ्यांची सहल संत गजानन महाराज उद्यान येथे नेण्यात येवून शाळेकडून विद्यार्थ्यांना स्नॅक्स देण्यात आला. तर दि. २४.१२.२०२४ रोजी L I, II, III, Pre-voc E + M यांची सहल दरेकर वाडा येथे नेण्यात आली होती.
- Pre-voc मधील ३ व L I E + M (इ. १० वी) मधील ६ विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यात आला.
- दि.०३ व ०४.०२.२०२४ हे दोन दिवस तिन्ही शाळांचे मिळून एकत्र ‘खेळ’ या विषयावर प्रदर्शन भरविण्यात आले होते. शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांनी चार्ट व प्रोजेक्ट करून आणले होते. विक्री साठी बाहेरील व्यक्तींना स्टॉल दिले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय बुध्दिबळपटू श्री. जयंत गोखले यांनी केले. तसेच स्नॅक्सचे विविध प्रकार होते. प्रदर्शन खूप छान झाले. विद्यार्थ्यांना वार्षिक परिक्षेत या प्रोजेक्टला मार्क देण्यात येणार आहे.

मेडिकल चेकअप

- दि. २५.०९.२०२४ रोजी डॉ. मोघे व डॉ. प्रभुणे याच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप करण्यात आले.

ISO Audit

- दि. २०.०८.२०२४ व दि. १८.०२.२०२५ रोजी Internal Audit हर्षा मुळे यांनी घेतले.
  दि. १९.११.२०२४ रोजी Surveillance Audit श्री. प्रविण चौधरी यांनी घेतले.

उपक्रम

- वेन्यू प्रशिक्षण संस्था व ज्ञानप्रबोधिनी यांच्या सहयोगाने GTBT प्रोजेक्ट केले. या प्रोजेक्टच्या सेशन्ससाठी फिनिक्स शाळेतील ७ विद्यार्थ्यांची निवड केली होती.

एस.एस.सी बोर्ड परिक्षा

- शाळेतील इंग्रजी माध्यम मधील ५ विद्यार्थी व मराठी माध्यम मधील १ विद्यार्थीने परिक्षा दिली.
- दि. २५.०३.२०२५ रोजी कुकिंग या विषयाचे बोर्डाचे प्रॅक्टिकल शाळेतच झाले. विद्यार्थ्यांनी कोथिंबीर वडी बनविली. आगाशे शाळेच्या मुख्याध्यापिका काजवे मॅडम परिक्षक म्हणून आल्या होत्या.

शैक्षणिक सहल

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| L II A, L I E + M | मेट्रो प्रवास |
| L III E + M , Pre-voc | कमला नेहरू पार्क |
| L II B E + L II B M | अग्निशामक दल - एरंडवणा |
| L III & L IV E + M | चित्तरंजनवाटिका येथील वाहतुक नियम फलक |
| L II A | पॅव्हॅलियन मॉल |
| L II B + M | बॅक ऑफ महाराष्ट्र - एरंडवणा |
| L III E + M | डेक्कन भाजी मंडई |
| Pre-voc | ग्राहक पेठ |

सांस्कृतिक कार्यक्रम

- दि. ०१ जून २०२४ रोजी वर्धापन दिन साजरा करण्यात आला. बेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूच्या मुख्याध्यापिका विद्या भागवत यांनी ललित लेखनाचे अभिवाचन केले.

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १८.०६.२०२४ | पर्यावरण दिन | - | मोठया विद्यार्थ्यांनी शाळेचा परिसर स्वच्छता, वर्ग स्वच्छता, झाडांना पाणी घालणे ही ॲक्टिव्हिटी केली तर छोटया विद्यार्थ्यांनी निसर्ग चित्र चित्रे रंगविली. |
| २१.०६.२०२४ | योग दिवस | - | विद्यार्थ्यांच्या एका गटाने कवायत प्रकार केले तर दुस-या गटाने योगासनाची प्रात्यक्षिके केली. |
| २९.०६.२०२४ | पालखी | - | यावर्षी शाळने सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी अभंग व भक्तिगीत सादर केले. |
| २२.०७.२०२४ | गुरूपौर्णिमा | - | विद्यार्थ्यांनी वादन, गायन, नृत्य सादर केले.<br>शिक्षकांनी गुरूपौर्णिमेची माहिती व गोष्ट सांगितली. |
| १४.०८.२०२४ | आर्ट ॲन्ड क्राफ्ट | अपर्णा आठल्ये | L II A + L I (E + M) + Pre-voc - तोरण बनविणे, मधुबनी चित्र पूर्ण करणे, मेंदी, राखी बनविणे<br>L II B (E + M) - रांगीत पेन्सिलने चित्र पूर्ण करणे, डाळीने कोलाज पूर्ण करणे, मेंदी , राखी बनविणे<br>L III + L IV (E + M) - भाज्यांचे ठसेकाम, राखी बनविणे, वेगवेगळया आकारांनी माणसाचे चित्र पूर्ण करणे, मेंदी |
| २७.०८.२०२४ | दहीहंडी | | L III - विद्यार्थी कृष्णा राधाचा वेश<br>LIV व LIII - विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडली.<br>LI I, LII व Pre-voc - विद्यार्थ्यांकडून दहीकाल्याचे प्रात्यक्षिक करून करून घेण्यात आले. |
| १४.०९.२०२४ | हिंदी दिवस | - | विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. |
| २३.०९.२०२४ | कै. पद्मजा गोडबोले कविता पाठांतर स्पर्धा | श्री. धीरज मडके | आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा - बाहेरील ७ शाळेतील ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. |
| ३०.११.२०२४ | स्नेहसंमेलन | नृत्यकलाकार सौ. उमा टिळक | विषय - ‘ऋतु’<br>प्रथमच शाळेच्या आवारात साजरे करण्यात आले. |
| १३.१२.२०२४ | क्रीडा दिन | जीवनज्योत मंडळाचे माजी क्रीडा शिक्षक श्री. तानाजी पुकळे | स्पर्धेत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. |
| २६.०१.२०२५ | प्रजासत्ताक दिन | रिअर ॲडमिरल (निवृत्त) आशिष कुलकर्णी | विद्यार्थ्यांनी गायन, डंबेल्स् व पिरॅमिडची प्रात्यक्षिक सादर केली. |
| २७.०२.२०२५ | मराठी दिन | - | विद्यार्थ्यांचे लेव्हल प्रमाणे वाचन घेण्यात आले.<br>छोटया विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. |
| २८.०२.२०२५ | विज्ञान दिन | - | अभ्यासक्रमातील प्रयोग केले. |
| २४.०३.२०२५ | म्युझिक डे | - | विद्यार्थ्यांनी समुह गायन, वैयक्तिक गायन व वादन सादर केले. |

पालक सभा

- दि . २० .0६ .२०२४ रोजी दोन्ही माध्यमांच्या पालकसभा घेण्यात आल्या . संचालिका हर्षा मुळे मॅ . यांनी संस्थेची माहिती दिली . विद्या भागवत मॅ . यांनी वेन्यू तर्फे घेतल्या जाणा-या कार्यशाळा, कोर्स व उपक्रमांची माहिती दिली . निती परांजपे यांनी मिटिंगची सुरूवात करून मान्यवरांची ओळख करून दिली . उषा अंभोरे विद्यार्थ्यांनी पाळण्याच्या नियमांची महिती दिली .
- L II A E मधील विद्यार्थी इ . १0 वी ची परिक्षा देणार आहेत . MVM शाळेतून विद्यार्थी १७ नंबरचा फॉर्म भरून परिक्षा देतील . शाळा ज्या विषयांची तयारी करून घेत आहे त्या सर्व विषयांची परिक्षेची तेथे सोय आहे . त्यासाठी काही फी पालकांना भरावी लागेल . यासर्वांची माहिती पालसभेत सांगण्यात आली .
- गरजेप्रमाणे प्रत्येक वर्गाच्या स्वतं>य पालकसभा घेण्यात आल्या .

मिटिंग

- मुख्याध्यापिकांनी शिक्षकांबरोबर गणेशोत्सव स्नेहसंमेलन, स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, परीक्षा यासंदर्भात पहिल्या शनिवारी मिटिंग घेण्यात आल्या .
  तसेच मार्च मध्ये स्वतं>यरित्या शिक्षक व मावश्याबरोबर संवाद साधला .
- मुख्याध्यापिकाच्या ॲडमिन स्टाफ बरोबर कार्यालयीन कामकाजाबावत आवश्यकतेनुसार मिटिंग होत असतात .
- संचालिका हर्षा मुळे यांनी मुख्याध्यापिका, शिक्षक व मावशी बरोबर पुढील मिटिंग घेतल्या :
  - वेळोवेळी शिक्षकांबरोबर मिटिंग घेऊन संवाद साधला . कामाचे नियोजन, स्नेहसंमेलन, फेब्रुवारी एकत्रित प्रदर्शन व इतर मुद्यांवर संवाद साधला .
  - वेळोवेळी मावशींबरोबर कामाबाबत संवाद साधला .
  - कै . पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धेच्या समितीबरोबर शाळांना स्पर्धेचे पत्र, निवडलेल्या कविता, प्रवेशिका, स्पर्धक संख्या, पाहुणे, सर्टिफिकेक्ट, पारितोषिके, बाहेरील येणा-या विद्यार्थ्यांना स्नॅक्स इ .
  - वर्षभरात मुख्याध्यापिकेबरोबर - अभ्यासक्रम, वेळापत्रक, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहली, अभ्यासाबरोबरच इतर ॲटिव्हिटी घेणे, पालक फिडबॅक, १५ ऑगस्ट, Behaviour Check list, मेडिकल चेकअप, ई-लर्निगचा वापर शिक्षकांनी करावा, गणेशोत्सव, दिवाळी पार्टी, Pre-voc मधील विद्यार्थ्यांना कॅन्टिन डयुटी द्यावी, स्नेहसंमेलन, क्रीडा दिन, सहलीच ठिकाण व नियोजन, नाताळ सुट्टी, २६ जानेवारी व प्रमुख पाहुणे, फेब्रुवारी एकत्रित प्रदर्शनाबाबत वेळोवेळी विषय, चर्चा आयोजन व नियोजन, ISO Audit, बाहेरील कार्यशाळा, बाहेरील स्पर्धेत सहभागी होणे, विद्यार्थ्यांना बाहेरील परीक्षांना वसविणे, एम .ओ .व्ही .एस मध्ये जाणा-या विद्यार्थ्यांची यादी बनविणे, Fee Sponsorship, पुढील वर्षाचे बजेट बनवणे, इंटर्नशिप साठी येणा-या विद्यार्थी, बाहेरील कॉलेजच्या व्हिजीट, वेन्यू आयोजित कोर्स, ट्रेनिंग, वर्कशॉप, विद्यार्थी फी फोलोअप, Fee sponsorship, शिक्षकांच्या शाळेत येण्याच्या वेळा, नविन ॲडमिशन, संबंधीत कागदपत्रे घेणे, विद्यार्थी परिपत्रक, जून पासून ऑफीसमध्ये Organogram बनविणे व लावणे, वाचनचा objective पुढील वर्षी ही चालू ठेवणे, पुढील वर्षीचे कॅलेंडर, अभ्यासक्रम, वेळापत्रक विद्यार्थी युनिफॉर्म व शूज, शिक्षक कार्यशाळा व कोर्स, फी, एप्रिल मधील शिक्षकांच्या वेळा, दि . 0१ जून रोजी कार्यक्रम बाबत
  - संचालिका हर्षा मुळे मॅ . यांच्याबरोबर WhatsApp call व्दारे स्नेहसंमेलनासाठी हॉल पाहणी केली त्याची माहिती दिली, प्रसन्न ऑटिझम सेंटर मधील विद्यार्थी प्रवेश व इतर शाळेच्या कामावावत
  - दोन्ही पर्यवेक्षिकेबरोबर वेळोवेळी शाळेचा अभ्यासक्रम व इतर कामासंदर्भात
- दि . १९ .0३२०२५ रोजी वेन्यू च्या मुख्याध्यापिकांनी मुख्याध्यापिकांबरोबर पुढील मुदयांवर चर्चा केली - पुढील वर्षीचे बनविलेले कॅलेंडर तपासले, अभ्यासक्रम एप्रिल मध्ये बनविणे, विद्यार्थ्यांची युनिफॉर्म मापे घेण्यासाठी टेलर (सावी ) दि . ११ ते १५ जून या कालावधीत येतील, पुढच्या वर्षी सर्व शनिवार विद्यार्थ्यांना सुट्टी असेल व शिक्षक शाळेत येतील, शिक्षक हाफ डे वेळेबावत, बोअरवेलला पाणी कमी असल्यामुळे मनपा पासून मिळणारे पाणी जपून वापरावे त्याबावत मावशी व काकांबरोबर बोलणे इ .

कार्यशाळा

- वर्षभर बेन्यू तर्फे गप्पागंण अंतर्गत शाळेतील शिक्षकांनी त्यांनी स्वत: निवडलेल्या विषयावर कार्यशाळा घेतली.

बाहेरील कार्यशाळा

- दि. २७ व २८.०६.२०२४ रोजी बालकल्याण संस्था आयोजित 'नॅचरोपॅथी, योगासने व प्रथमोपचार' कार्यशाळेत मुख्याध्यापिकेने सहभाग घेतला.
- दि. २९ व ३०.०७.२०२४ रोजी बालकल्याण संस्थेने मेंदी प्रशिक्षणांचे आयोजन केले होते. या प्रशिक्षणात चार विद्यार्थीनी व एका शिक्षिकेने सहभाग घेतला.

भेट

- दि. ०९.०८.२०२४ रोजी सिंम्बोयसिस कॉलेज - सायकॉलॉजी डिपार्टमेंटच्या ८० विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देवून माहिती घेतली.
- दि. १८.१०.२०२४ रोजी मॉडर्न कॉलेज सायकॉलॉजी डिपार्टमेंटच्या ३५ विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देवून माहिती घेतली.
- MIT College - Psychology Department मधील २४ विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देवून माहिती घेतली.

विद्यार्थी शाळा सोडण्याबाबत

- आरोग्याच्या कारणामुळे एका विद्यार्थीनीने नोव्हेंबर पासून लार्क शाळेत प्रवेश घेतला आहे.
- यावर्षी नविन ॲडमिशन झालेले २ विद्यार्थ्यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणामुळे शाळा सोडली आहे.

शिक्षक

- दि. ०९.१२.२०२४ रोजी नवक्षितीज संस्थे तर्फे आयोजित विशेष शिक्षक सन्मान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयात शाळेतील संगीत शिक्षक माधव पोस्ते व शिक्षिका प्रमिला पुकळे यांचा सम्मान करण्यात आला.

नविन शिक्षिका

- दि. ०१.०६.२०२४ पासून निलिमा देवरे या शिक्षिका पदावर रूजू झाल्या आहेत.
- शाळेच्या निवृत्त शिक्षिका मृणालिनी बिळगी व नीलू वर्मा या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी येत आहेत.

शिक्षक राजीनामा

- मुख्याध्यापिका सुचेता पावगी यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला आहे.
- सोनाली नाहा या शिक्षिकेने वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला आहे.
- निलिमा देवरे या शिक्षिकेने वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला आहे.

शिक्षक रजा

- निती परांजपे व प्रमिला पुकळे या दोन शिक्षिकांनी शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ हे एक वर्ष रजा घेतली आहे. तसा अर्ज दिला आहे.

बाहेरील विद्यार्थी

- प्रसन्न ऑटिझम सेंटर मधून दोन विद्यार्थी तीन दिवस शाळेत पुढील वर्षीच्या ॲडमिशन साठी येत होते. त्यांना L III E वर्गात बसविण्यात आले होते.

इंटर्नशिप

- कर्वे इन्स्टिट्यूट मधून MSW करणारी विद्यार्थीनी ऑगस्ट, ऑक्टोबर २०२४, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल २०२५ मध्ये इंटर्नशिप साठी सोमवार, मंगळवार व बुधवार येत होत्या.
- मॉडर्न कॉलेजची एक विद्यार्थीनी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठची एक विद्यार्थीनी इंटर्नशिपसाठी येत होत्या.
- जानेवारी ते एप्रिल या कालावधीत SEED - Art Based Therapy course अंतर्गत प्रभा वाडीकर या विद्यार्थीनीने ABT सेशन्स ऑटिस्टीक विद्यार्थ्यांबरोबर घेतले. यासाठी ६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

इतर

- या ही वर्षी विद्यार्थी पहिला, तिसरा व पाचवा मंगळवारी बालकल्याण संस्थेमध्ये जाऊन तेथील सर्व सुविधांचा लाभ घेतला आहे.
- २०१९ ते २०२३ - NIOS व २०१८ ते २०२३ - SSC पास विद्यार्थ्यांच्या नावाचे नविन बोर्ड तयार करून हॉल नं. १ मध्ये लावण्यात आले आहे.
- अतिवृष्टी मुळे जुलै मध्ये विद्यार्थ्यांना तीन दिवस व शिक्षकांना एक दिवस सुट्टी देण्यात आली होती. तर सप्टेंबर मध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षकांना एक दिवस सुट्टी देण्यात आली होती.
- दि. २५ ते २७.१२.२०२४ नाताळ सुट्टी देण्यात आली होती. दि. ३०.१२.२०२४ पासून शाळा नियमित सुरू झाली. मात्र शिक्षक व विद्यार्थी यांची संख्या खूप कमी होती.
- केतकी कुलकर्णी या शाळेचे कामकाज समजून घेण्यासाठी व निरीक्षणासाठी येत आहेत.

सुचेता पावगी<br>
मुख्याध्यापिका<br>
फिनिक्स स्कूल